# जाहीर आवाहन

कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात लॉकडाऊन परिस्थिती लागु केल्याने उद्योग व व्यवसाय प्रभावित झाल्यामुळे परराज्यातील कामगार विस्थापित /बरोजगार झाले आहेत. त्यांच्या बाबतीत त्यांच्या मुळ गावी जाण्यासाठी खालील प्रमाणे नोंदणी करावयाची आहे.

१. पालघर जिल्हयातून **इतर राज्यात रेल्वेने जाण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीनी यापुर्वी covid19.mhpolice.in व** http://c19trformpalghar.webstag.net या दोन्ही लिंकवर नोंदणी केलेली नाही. अशा व्यक्तीनी **covid19.mhpolice.in या लिंक वरती नोंदणी करावी.**

२. पालघर जिल्हयातून **इतर राज्यात खाजगी वाहनाने (राजस्थान,कर्नाटक आणि तामीळनाडू वगळून) जाण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीनी यापुर्वी covid19.mhpolice.in व http://c19trformpalghar.webstag.net** या दोन्ही लिंकवर नोंदणी केलेली नाही. अशा व्यक्तीनी **http://c19trformpalghar.webstag.net या लिंक वरती नोंदणी करावी.**

३. सदर लिंकवर जाऊन **इतर राज्यात रेल्वेने जाण्यास** तसेच **खाजगी वाहनाने (राजस्थान,कर्नाटक आणि तामीळनाडू वगळून) जाण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीनी** त्यांची नोंदणी केल्या नंतर पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयात दुरध्वनी करण्याची तसेच इमेलवर पत्रव्यवहार करण्याची आवश्यक्ता नाही. खाजगी वाहनानी जाण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीना त्यांचा E pass सदर लिंकवर जाऊन डाऊनलोड करुन पाहता येईल. तर रेल्वेने परराज्यात जाऊ इच्छीणाऱ्या व्यक्तीना रेल्वेची उपलब्धता झाल्या नंतर त्यांना त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या **संपर्क क्रमांकावर** त्यांनी कोणत्या दिवशी रेल्वेने प्रवास करावयाचा आहे. या बाबत कळविण्यात येईल. त्यांनी विनाकारण घराबाहेर येऊन चौकशी करण्याची आवश्यक्ता नाही.

**दिनांक:-१०/५/२०२०**

**सही/-**
**(डॉ.कैलास शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर**

Scanned with CamScanner